महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती
# महाराष्ट्र जनशक्ती
मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ३१९ वा | दिनांक : १९/१०/२०२५ | वार : रविवार

# बीडच्या ओबीसी मेळाव्यावर पंकजा मुंडेंची प्रतिक्रिया



**मुंबई** : बीड जिल्ह्यात नुकताच झालेला ओबीसी समाजाचा महाएल्गार मेळावा गाजला. या मेळाव्यात मंत्री छगन भुजबळ आणि धनंजय मुंडे यांनी सरकारवर आणि विशेषतः मराठा आरक्षणाच्या निर्णयावर जोरदार हल्ला चढवला. भुजबळांनी मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यावर तीव्र टीका केल्याने राजकीय वर्तुळात खळबळ माजली आहे.

छगन भुजबळ आणि धनंजय मुंडे यांच्या भाषणाविषयी विचारले असता, पंकजा मुंडे यांनी प्रतिक्रिया देणे टाळले. मी त्यांची भाषणे पाहिली नाहीत, थोड्या वेळाने पाहील, असे पंकजा मुंडे म्हणाल्या. तसेच भुजबळ साहेबांनी त्यांची बाजू मांडली असावी, असेही त्या म्हणाल्या.

बीडमध्ये ओबीसी समाजाने मराठा आरक्षणासंदर्भातील सरकारी निर्णयाला विरोध करत 'महाएल्गार मेळावा' आयोजित केला होता. या मेळाव्यात मंत्री छगन भुजबळ यांनी मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यावर केलेल्या तिखट टीकेमुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. पंकजा मुंडे या मेळाव्यात अनुपस्थित होत्या.

**नेमके काय म्हणाल्या पंकजा मुंडे?**

याच मेळाव्याबाबत पंकजा मुंडेंना पत्रकारांनी विचारले असता, मला अजून भाषणे पाहायला वेळ मिळाला नाही. थोड्याच वेळात पाहीन. भुजबळ साहेबांनी याआधीही असे मेळावे घेतले आहेत, त्यांनी आपली बाजू मांडली असावी, अशी संतुलित प्रतिक्रिया त्यांनी दिली.

मेळाव्यात धनंजय मुंडे यांनी केलेल्या “अंगावर आले की शिंगावर घ्या” या व्यवक्त्यावर प्रतिक्रिया दिली. कोणत्याही भाषणावर मी बोलत नाही. बोलू शकते, पण बोलत नाही. मी कधीच दुसऱ्यांच्या भाषणावर टिप्पणी करत नाही. ते चांगले वक्ते आहेत, त्यांनी चांगले काय बोलले ते मला सांगा, असे पंकजा मुंडे म्हणाल्या.

# मी कुत्र्यांना सांगतो उड्या मारू नका : अजित पवार



**सातारा** : अजित पवार शनिवारी सातारा जिल्ह्यातील फलटणच्या दौऱ्यावर होते. यावेळी एका व्यक्तीने त्यांच्याकडे डिव्हायडर छोटे असल्यामुळे कुत्री आमच्या गाड्यांपुढे उड्या मारत असल्याची तक्रार केली. त्यावर अजितदादांनी आता मी कुत्र्यांना उड्या मारू नका असे सांगतो, म्हणत आपल्या डोक्याला हात लावला. अन्य एका प्रश्नाला उत्तर देताना त्यांच्यावर पुन्हा डोक्याला हात लावण्याची वेळ आली आणि उपस्थितांत एकच हशा पिकला.

अजित पवार म्हणाले, सरकारची विविध विकासकामे करताना कॉन्ट्रॅक्टर चांगला असेल तरच चांगली कामे होतात. अन्यथा नाही. कॉन्ट्रॅक्टर खराब असेल तर सरकालाही त्रास होतो. अनेक कामे रेंगाळतात. त्यामुळे राजकारण करण्याची इच्छा असणाऱ्यांनी कॉन्ट्रॅक्टर बनू नये आणि ज्यांना कॉन्ट्रॅक्टर व्हायचे आहे त्यांनी राजकारणात येऊ नये असा माझा नेहमी कटाक्ष असतो. यावेळी अजित पवारांनी स्थानिक विकासकामांतील योगदानांचा उल्लेख करत काही जणांची नावे घेतली. यावेळी एक गावकरी उठला आणि म्हणाला, तुम्ही साडेतीन वर्षे सरपंच राहिलेल्या व्यक्तीचे नाव घेतले नाही.

त्यावर अजित पवारांनी त्याला चटकन उलटप्रश्न केला, मी इथे लोकांची नावे घ्यायला आलो की काम करायला आलो? मी कधी बायकोचे नाव घेतले नाही. मी इथे उखाणे घ्यायला आलो का? तुम्ही डोक्यावर पडलात का? या प्रसंगानंतर अजित पवारांनी बारामतीपर्यंत जाणारे रस्ते कसे चांगले केले याचा उल्लेख केला. यावेळी आणखी एका व्यक्तीने एक मजेशीर प्रश्न त्यांना केला.

हा व्यक्ती म्हणाला, दादा रस्त्यावरील डिव्हायडर थोडे मोठे करा. कुत्री उड्या मारून आमच्या गाडीसमोर येतात व अपघात होतात. त्यावर अजित पुन्हा मिश्किलपणे म्हणाले, मी कुत्रांना सांगतो उडी मारू नको. त्यांच्या या विधानावरही उपस्थितांत एकच खसखस पिकली. त्यानंतर भाषण सुरू असताना आणखी एका व्यक्तीने दादा आमच्या फलटणला पदरात घ्या असा प्रश्न केला. त्यावर अजित पवार म्हणाले, आता माझा पदर फाटलाय. हे बोलल्यानंतर त्यांनी फलटणमधील विकासकामांकडे लक्ष देण्याची ग्वाही दिली.

यावेळी काही गावकऱ्यांनी त्यांच्यापुढे गावातील वादांचा मुद्दा उपस्थित केला. ग्रामपंचायतीकडून विरोधकांची अडवणूक केली जात असल्याचे ते म्हणाले. त्यावर अजित पवार म्हणाले, ग्रामपंचायतीचे कारभारी तुम्ही निवडून दिलेत. विकासकामांसाठी पैसे देणे माझे काम आहे. गावातील वाद हे गावातीलच थोरामोठ्यांनी एकत्र बसून चर्चेद्वारे सोडवले पाहिजेत. ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत मी तुम्हाला अमूक एका व्यक्तीला निवडून आणण्यासाठी बटण दाबण्यास सांगितले होते का? आता पायताण घ्या आणि माझ्या डोक्यात टाका. त्यांचे हे विधान ऐकताच उपस्थितांत एकच हशा पिकला.

ते पुढे म्हणाले, तुमच्या इथे कंपन्या आहेत. त्यांचा टॅक्स वाढवा. सध्या तुम्हाला फक्त २० लाख कर मिळतो. धंदापाणी नीट करा. गावात एकोपा ठेवा. जातीय सलोखा राखा. जातीय वादाने कुणाचेही भले झाले नाही. बारामती ॲग्रो फक्त साडेतीन लाख कर देते. थोडे वाढवा. पूर्वीचा काळ वेगळा होता. आताचा वेगळा आहे. डिस्टलरी मालकांना दादांनी आवाहन केल्याचे सांगा.

# धनंजय मुंढेनी मेहुणीसोबत केले गैरकृत्य : करुणा शर्मा मुंढे यांचा गंभीर आरोप

**मुंबई** : माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी आपल्या मेहुणीसोबत म्हणजे माझ्या बहिणीसोबत गैरकृत्य केले. माझी आई या प्रकरणी पोलिसांत तक्रार करणार होती. पण तिच्यावरही मोठा दबाव टाकण्यात आला. यामुळे तिलाही आत्महत्या करावी लागली, असा आरोप धनंजय यांच्या पत्नी असल्याचा दावा करणाऱ्या करुणा शर्मा मुंडे यांनी केला आहे. त्यांच्या या आरोपामुळे धनंजय मुंडे यांचा पाय आणखीनच खोलात जाण्याची भीती निर्माण झाली आहे.

करुणा शर्मा यांनी शनिवारी एका मराठी वृत्तवाहिनीशी संवाद साधला. त्यात त्यांनी वरील आरोप केला. त्या म्हणाल्या, राजश्री मुंडे (धनंजय मुंडे यांच्या पत्नी) व मी आम्ही दोघी २००५ मध्ये एकाच वेळी गरोदर राहिलो. त्यानंतर मी डिलिव्हरीसाठी इंदूरला गेले. त्यावेळी धनंजय मुंडे यांनी माझ्या बहिणीसोबत गैरकृत्य केले. त्यानंतर माझ्या बहिणीने तिच्यासोबत घडलेला प्रसंग घरात सांगितला. तेव्हा माझी मुले छोटी होती. मला त्या घटनेची काही माहितीही नव्हती. त्या घटनेत माझा नवरा दोषी आहे की माझी बहीण दोषी आहे हे मला ठावूक नव्हते. वस्तुस्थिती माहिती असल्याशिवाय आपण एखाद्या व्यक्तीविषयी बोलू शकत नाही. पण या प्रकरणात एकीकडे माझी बहीण व दुसरीकडे माझा नवरा होता.

**आईवर आत्महत्या करण्याची वेळ आणली**

करुणा शर्मा मुंडे पुढे म्हणाल्या, माझी आई या प्रकरणी तक्रार करण्यासाठी पोलिसांत जाणार होती. पण तिच्यावर मोठा दबाव आणला गेला. त्यामुळे तिने आत्महत्या केली. तिची सुसाईड नोट आजही माझ्याकडे आहे. या प्रकरणी कोर्टात केस सुरू आहे. कौटुंबिक हिंसाचाराच्या प्रकरणात मी सर्व गोष्टी लिहून दिल्या आहेत. आता जे काही सुरू आहे, ते सर्व पुराव्यांवर सुरू आहे. पण या लोकांनी माझ्या घरातील पेनड्राईव्ह, संगणकाची हार्डड्राईव्ह आदी सर्वच गोष्टी नेल्या. त्यानंतर वरळी पोलिस ठाण्यातून मला माझा आयपॅड व ड्राईव्ह मिळाले. पण त्यांनी त्यात काहीही ठेवले नाही. माझ्या हातात फक्त डब्बा दिला. त्यात काहीच नाही.

**मनोज जरांगेंकडे मदतीची केली विनंती**

करुणा शर्मा यांनी यावेळी आपण मराठा आंदोलक मनोज जरांगे यांची भेट घेऊन आपल्याला मदत करण्याची विनंती केल्याचीही माहिती दिली. यासंबंधी त्यांनी जरांगे यांचे कौतुकही केले. त्या म्हणाल्या, मनोज जरांगे यांची भेट घेऊन मी त्यांच्याकडे न्याय मिळवून देण्याची मागणी केली. पण त्यांनी मी एकटाच धनंजय मुंडे यांना खेटण्यासाठी सक्षम असल्याचे सांगितले. त्यांनी मला चांगला सल्ला दिला. आज माझ्या मुला-मुलींना न्याय मिळत नाही. त्यांचे खच्चीकरण सुरू आहे. माझ्या हिऱ्यासारख्या मुलाच्या हाताला काम नाही. तो २२ वर्षांचा झाला असताना मागील ३ वर्षांपासून घरात बंदिस्त आहे. त्याच्या डोक्यावर परिणाम झाला तर काय करायचे?

मला लोकांमध्ये फिरण्याची हौस नाही. त्यांनीच माझ्यावर ही वेळ आणली आहे. समाजाने केलेल्या मतदानाचा गैरवापर करणाऱ्यांविरोधात मी लढत आहे. त्यांचा खरा चेहरा जनतेसमोर उघड करण्यासाठी मी लढत आहे, असेही करुणा यावेळी बोलताना म्हणाल्या.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १९ ऑक्टोबर २०२५


## आदिवासी चळवळीचे केंद्र, जेहूर गटात ईच्छुकांच्या भेटीगाठी




**कन्नड (अरुण थोरात):** जेहूर जि.प. गट अनुसूचित जमाती महिला साठी तर पंचायत समिती गण अ.सुचित जमाती, औराळा गण अनुसूचित जाती साठी आरक्षित झाल्याने इतर प्रवर्गातील मातब्बर उमेदवार शांत बसले असले तरी, या प्रवर्गातून इच्छुक उमेदवारांची संख्या मोठी आहे. इच्छुकांनी मतदारांच्या भेटीगाठी घेण्यास सूरुवात केली आहे.

जेहूर जि.प. गटात आदिवासी समाज घटकांची संख्या मोठी आहे. तालुक्यातील आदिवासी न्याय हक्क चळवळींचे केंद्र याच गटातून उभारीस आले आहे. सत्यशोधक ग्रामीण कष्टकरी सभा या संघटनेच्या माध्यमातून आदिवासी व इतर पारंपारिक वनहक्क चळवळीचा लढा राज्य पातळीवर पोहचलाय, सह्याद्री आदिवासी ठाकर समाज संस्था, गौताळा आदिवासी ठाकर समाज संस्था, आदिम जाती सेवा मंडळ, एकलव्य आदी संघटना आदिवासींच्या न्याय हक्कांसाठी लढत आहेत. या गटातील अंबाळा हे शंभरटक्के आदिवासी ठाकर समाज असलेले गाव आहे तर कोळवाडी ठाकरवाडी, कळंकी, पेडकवाडी, बिबखेडा, जेहूर ठाकरवाडी, धोंडकोंडूवाडी, चिवळी आदी गावांत ही ठाकर समाजाची मतदार संख्या मोठी आहे. या समाजातील खेमा मधे यांनी पंचायत समिती सभापती पद भुषविले आहे.

तर आदिवासी भील्ल समाज जवळपास सर्वच गावांत आहे. त्यामुळे उमेदवार निवडताना राजकीय पक्ष, नेत्यांना सामाजिक समिकरणांचा विचार करुणच उमेदवार द्यावा लागणार आहे. जेहूर जि.प. गट अनुसूचित जमाती महिला प्रवर्गासाठी राखीव सुटला असल्याने येथील निवडणूक साधी सरळ होईल असे वरकरणी वाटत असले तरी, प्रत्यक्षात येथील लढत ही अटीतटीची असणार आहे. आदिवासी समाज घटकातील नवी पीढी शिक्षीत असल्याने आपल्या न्याय हक्कांसाठी जागरुक आहे. त्यामुळे ईच्छूक उमेदवारांची संख्या ही मोठी असणार आहे. जिल्हा परिषदेत आपले संख्याबळ वाढविण्याच्या दृष्टीने राजकीय पक्ष नेत्यांनी ही या गटातील उमेदवारांची चाचपणी सुरु केली आहे. आदिवासींची एकगठ्ठा मते मिळवू शकणारा, सर्वपरिचीत, पक्षानुकूल उमेदवार निवडण्यात नेत्यांचा कस लागणार आहे. दरम्यान काही इच्छुक उमेदवारांनी वयक्तिक पातळीवर मतदारांच्या भेटीगाठी सुरु केल्या आहेत. भौगोलिक दृष्ट्या जेहूर गटाचे काळीभूई व डोंगरमाथा असे दोन भाग पडतात. त्यामुळे दोन्ही भागांना परिचीत चेहरा व प्रादेशिक समतोल हा घटक ही या निवडणुकीत महत्वाचा ठरणार आहे. गेल्या जि.प. निवडणूकीत भाजप चे सुरेश आण्णा गुजराणे यांनी येथून प्रतिनिधीत्व केले तर औराळा पंचायत समिती गणाचे प्रतिनिधीत्व भाजपचे सुनील निकम, जेहूर गणातून तत्कालीन शिवसेनेच्या श्रीमती पवार या निवडून आल्या होत्या. गेल्या सहा वर्षांत बरेचसे पाणी पुला खालून गेल्याने आता भाजप ला आपली जागा राखण्यासाठी तगडा उमेदवार शोधावा लागेल, भाजप सह शिवसेना (शिंदे) ची मोठी ताकद् या गटात वाढल्याने महायुती उमेदवारी बाबत काय निर्णय घेते, महायुती, महा विकास आघाडी, हे युती करुण लढतात की स्वतंत्र, या निर्णयागोदरच सर्वच पक्षांनी उमेदवारांचा शोध घेणे सुरु केले आहे.जेहूर गटातील चर्चेतील मातब्बर:- मंजुळाबाई खेमा मधे(कोळवाडी ठाकरवाडी), हौसाबाई गंगाराम आगीवले(अंबाळा), यशोदाबाई लक्ष्मण पवार(वडनेर), अंजनाबाई मच्छिंद्र मलदूडे(चिंचखेडा), हिराबाई चिंधा पवार, सयाबाई कचरु सावंत(जेहूर), हिराबाई पारवे(औराळा),

## बालकांसाठीच्या मासिकांसाठी सर्व स्तरांवर प्रयत्न होणे आवश्यक

'वयम्' हे मुलांसाठीचे दर्जेदार मासिक आता बंद होत असल्याचे वाचून खूप वाईट वाटले. कागद, छपाई आणि टपाल/कुरियर खर्च प्रचंड वाढल्याने आणि अपेक्षित प्रमाणात वर्गणीदार मिळत नसल्याने ते कायमचे बंद होत आहे. मराठीत मुलांसाठी वाहिलेली मासिके तशी दुर्मिळच.

त्यात वयम सारखे मासिक बंद पडणे, ही दु:खदायक गोष्ट आहे. वयम मासिक खूप उत्तम प्रकारे निर्मिलं गेलं ; मात्र ते ग्रामीण भागातील बालकांपर्यंत/ वाचकांपर्यंत पोहोचू शकलं नाही, त्याआधीच ते बंद होत असल्याची खंत आहे. बरीचशी मासिके वर्गणी भरूनही पत्त्यावर पोहोचत नाहीत म्हणून त्यांची वर्गणी भरणे बंद केले जाते.

बालमासिके किमान वर्गणीदारांपर्यंत वेळेवर पोहोचावीतच याबाबत यंत्रणेत मोठा सकारात्मक बदल होण्याची गरज आहे. पालक, शिक्षक, साहित्यिक, प्रकाशन संस्था, दाते आणि शासन सर्वांनी मिळून प्रयत्न केले तर अशी दर्जेदार मासिकं टिकू शकतील, वाढू शकतील. यांतून जास्तीत जास्त बालवाचक तयार झाले, वाढले तर वाचकांची आणि साहित्यप्रेमींची संख्या वाढेल, हे नक्की.

**डॉ.विनोद सिनकर,**
बालसाहित्यिक, छत्रपती संभाजीनगर.भ्र - 7588736326.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस

डी.टी.पी. जॉब वर्क | एम.फिल-पी.एच.डी. थेसिस | मराठी, हिंदी, इंग्रजी | कलर प्रिंट स्कॅनिंग | झेरॉक्स | स्पायरल बायंडिंग | लॅमिनेशन | थेसिस बायंडिंग

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद

8956362639, 8087880274, 9405109103


## राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत शिऊरची संस्कृती जाधव सुवर्णपदकाची मानकरी



**शिऊर (प्रतिनिधी ) :** सिद्धगिरी नर्सिंग इन्स्टिट्यूट कोल्हापूर येथे महाराष्ट्र युनिव्हर्सिटी ऑफ हेल्थ सायन्स तर्फे राज्यस्तरीय क्रीडा महोत्सव २०२५ चे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल, बास्केटबॉल, गोळाफेक, थालीफेक, भालाफेक ,लांबउडी, उंचउडी इत्यादी स्पर्धा प्रकारांचा समावेश करण्यात आला होता.

संभाजीनगर ,पुणे, अमरावती, नागपूर, मुंबई आणि नाशिक या सहा झोन मधील महाराष्ट्रातील खेळाडू सहभागी झालेले होते. कु. संस्कृती मच्छिंद्र जाधवने गोळाफेक या खेळ प्रकारात ७.८१ मीटर गोळा फेक करत प्रथम क्रमांक मिळवत सुवर्ण पदक पटकावले. शिऊरसारख्या ग्रामीण भागातील विद्यार्थिनीने मिळविलेल्या या यशाबद्दल तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.


१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा) विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

D.M.L.T

Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १९ ऑक्टोबर २०२५


## बोजा

आयुष्याची चोळी बांगडी करता-करता
कर्जाचा घडा भरला
आयुष्यभर तरफडा केला
तेच कर्ज फेडायला

म्हसनात जावस्तोर काढ कर्ज
जिथून मिळेल तिथून बोचक कर्ज
चार चारदा हाकल्ल तरी
म्हणायचं दे ना साहेब कर्ज

कर्ज कुणी देईना म्हणून
लय आपट झपट केली
शेवटी बायकोच्या दागिण्यावर नजर गेली
सोनं गहान ठेवून कर्जाची खाज खाजवली

हाप चड्डी पासून लाली पावडर पर्यंत
सगळाच खर्च कर्जावर पेलला
कर्जा पायी शेवटी
बोजा उतरता उतरता राहिला

बेबाकी कधी घेतलीच नाही
नुस्ता टॉप अप मारत राहिला
शेवटी बोजा उतरता उतरता राहिला

बऱ्याचदा हप्ता थकल्यावर
दर महिन्याला नातेवाईक मारला
मरमर मरला , बऱ्याचदा
हप्त्यांनसाठी वसुलीवाल्याना नडला

थकबाकीला वसुलीपथक आलं की
बऱ्याचदा दादांचा ,भाऊचा वशिला लावला
दर महिन्याला त्याची तीच बोमाबोम म्हणून
वशिलावाल्यांनी ही त्याला टाळला

उचाक्या पाचाक्या करुन
हप्ता शेवटचा भरला
आणखी काहीतरी घ्यायचं म्हणून
पुन्हा कर्जाचा अर्ज भरला

बेबाकी कधी घेतलीच नाही
नुस्ता टॉप अप मारत राहिला
शेवटी बोजा उतरता उतरता राहिला

-----------------------------

**लक्ष्मण वाल्डे -कन्नड**
छत्रपती संभाजीनगर
मो.नं:-८८८८६०६०६८

## धनत्रयोदशी शेतकऱ्याची

धनत्रयोदशी पण घरी काळोख
भाव न मिळे पिकाची झाली राख
कापूस पडला भिजत पाण्यात
स्वप्नं विरली गारव्याच्या धुक्यात।

सोयाबीन सडले पावसात
मका कोंब फुटले कणसात
शासनाचे आदेश कागदात,
शेतकरी मात्र जगतो आसवात

ओलसर शेती रिकामे हाती
पिकात होती आशेची ज्योती।
अती वृष्टी ने केली हानी,
तरीही टिकवतो जीवनाची वाणी।

जगी हा सोन्याचा सण
आमच्या सोन्याला जगी मोल नाही
जगाचा अन्नदाता शेतकरी
तरी अंधकार त्याच्याच दारी

तरीही आम्ही उभे राहतो
शेतीत आम्ही घाम गाळतो
देवा पुढचं पीक फूलव ना
करतो अशीच प्रार्थना

काव्य रचना
**संदिप नानासाहेब वाकडे**
रा.खेडा ता.कन्नड
९७६६९ ९२७७६

## प्रदुषण मुक्त दिवाळी

पर्यावरण रक्षणासाठी
घेवूया आपण व्रत
प्रदुषण मुक्त दिवाळीची
करूया सुरूवात

धरू नका कुणी
हाती सुरसुरी
पणत्या लावूनी
हौस करा पुरी

सुतळी बॉम्ब फोडतांना
धोका असतो जीवाला
आमंत्रण देवू नका
ध्वनी प्रदुषणाला

घातक फटाक्यांना
दूर आता सारा
मातीचे दिवे लावूनी
आनंद लूटू न्यारा

फराळाची करूया
रिकामी थाळी
फटाक्यांविना
साजरी करू दिवाळी



**- रवींद्र व्ही. चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६

## उठ मित्रा

उठ मित्रा खूप झाले
रोजरोजचे रडगाणे
सिद्ध हो पुन्हा लढाया
वाजण्या तुझे नाणे

खूप लढाया हरला
युद्ध बाकी जिंकायचे
आला आहे जगी राजा
लढा देऊनी जायचे

खूप आले अन् गेले
विना लढताच मेले
लढणारे अमर झाले
बाकी काळाआड गेले

म्हणून तुला लढायचे
हरणे जिंकणे चालायचे
काळाच्या पडद्यावर
नाव कोरून जायचे

**ज्ञानेश्वर गायके**
**कन्नड**
**मो.९४०३३८४८८९**







महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १९ ऑक्टोबर २०२५

# अंध:कारातून प्रकाशाकडे : अंधश्रद्धा निर्मूलनाचा समाजशास्त्रीय प्रवास

अंधश्रद्धा ही केवळ वैयक्तिक श्रद्धेची किंवा धार्मिक भावनेची बाब नाही; ती आपल्या समाजाच्या संरचनेत, संस्कृतीत आणि सत्तासंबंधांमध्ये खोलवर रुजलेली सामाजिक वास्तवता आहे. भारतीय समाजशास्त्रीय जीवनाचा अभ्यास केल्यास दिसते की श्रद्धा आणि अंधश्रद्धा यांचा परस्परसंबंध हा मानवाच्या सामाजिक व मानसिक गरजांशी निगडित आहे. श्रद्धा व्यक्तीला आधार देते, आशा देते, पण विवेकशून्य श्रद्धा म्हणजेच अंधश्रद्धा समाजाला अंधारात ढकलते. इमाईल दुर्खीमच्या 'सामूहिक चेतना' या संकल्पनेप्रमाणे समाजातील विश्वास प्रणाली ही एकात्मतेचे साधन असते; परंतु जेव्हा ही चेतना अज्ञान, भीती आणि सत्तेच्या रचनेशी गुंतते, तेव्हा ती दमनाचे साधन बनते. भारतीय समाजात अंधश्रद्धेचा इतिहास प्राचीन धार्मिक संस्कृतीशी जोडलेला आहे. ग्रहदोष, अपशकुन, शुद्ध-अशुद्धतेचे निकष, जातिव्यवस्था, स्त्रीविषयक बंधने या सर्वांनी समाजात रूढ झालेल्या श्रद्धांना 'दैवी सत्य' म्हणून मान्यता दिली. काळ जसजसा पुढे गेला तसतसे विवेक व तर्क यांची जागा अंधश्रद्धेने घेतली. समाजात स्त्रियांवर झालेली अन्यायपूर्ण बंधने, मासिक पाळीशी निगडित अपवित्रतेचे समज, विधवांना समाजातून बहिष्कृत करणे, 'डायन' ठरवून महिलांवर अत्याचार करणे या सर्व घटना समाजाच्या सांस्कृतिक अधोगतीचे द्योतक ठरल्या. या अंधश्रद्धांना ब्रिटिशकालीन समाजसुधारकांनी आणि नंतर राजा राममोहन रॉय, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पेरियार, महात्मा गांधी अशा समाजप्रबोधनकारांनी आव्हान दिले. त्यांनी विज्ञानाधारित विचारसरणी, शिक्षण आणि समानतेचा पुरस्कार करून समाजात विवेकवाद रुजवला. तथापि, आधुनिक भारतात अंधश्रद्धा संपलेली नाही; ती नव्या स्वरूपात जिवंत आहे. आज अंधश्रद्धा बाजारपेठेतून विकली जाते. तंत्र-मंत्र, ग्रहदोष, वास्तुशास्त्र, अंकशास्त्र, ऑनलाइन भविष्यवाणी, चमत्कार विक्री हे त्याचे आधुनिक रूप आहे. या नव्या अंधश्रद्धा शिक्षित वर्गालाही जखडतात, कारण त्या भीती आणि असुरक्षिततेवर पोसल्या जातात. समाजशास्त्रीय विश्लेषणानुसार अंधश्रद्धा टिकते कारण ती समाजातील सत्ता-संबंधांना पूरक ठरते. धर्म, जात आणि लिंग या रचनेतून मिळणाऱ्या सत्तेचा लाभ घेणारे घटक अंधश्रद्धेचे पोषण करतात. "दैवी इच्छा", "कर्मफळ", "ग्रहदोष" अशा संकल्पनांद्वारे लोकांना विद्यमान असमानतेला नैसर्गिक मान्यतेचे रूप दिले जाते. गरीब माणूस आपल्या दारिद्र्याला देवाची शिक्षा मानतो, स्त्री आपली दुय्यम स्थिती "कर्माचा परिणाम" मानते, आणि अशा प्रकारे अंधश्रद्धा विषमता टिकवते. सांस्कृतिक दृष्टिकोनातून पाहता, परंपरा आणि अंधश्रद्धा यांचा घनिष्ट संबंध आहे. परंपरा सामाजिक एकात्मतेचे प्रतीक असली, तरी जेव्हा ती प्रश्न विचारण्यास नकार देते, तेव्हा ती अंधश्रद्धेत रूपांतरित होते. परंपरा व्यक्तीला सांत्वन देते, पण जेव्हा ती विवेकावर पडदा टाकते, तेव्हा सामाजिक प्रगती थांबते. भारतीय समाजात अनेक पारंपरिक विधी आणि सण सामाजिक संबंध दृढ करतात, पण त्याचबरोबर काही रूढी आरोग्य, शिक्षण, स्त्रीस्वातंत्र्य आणि सामाजिक निर्णयक्षमतेवर मर्यादा घालतात. या रूढींच्या व्यावसायिकीकरणामुळे अंधश्रद्धा आज उद्योग बनली आहे, चमत्कार विक्री, पूजा-पाठांचे पॅकेज, शुभरंग, वास्तु उपाय, रत्नधारण या साऱ्यांनी विवेकाचा व्यापार सुरू केला आहे. म्हणूनच बदलाचा मार्ग म्हणजे परंपरेचा नकार नव्हे, तर तिचे तर्कसंगत पुनर्निर्देशन होय. अंधश्रद्धेचे आर्थिक स्वरूप अधिक गुंतागुंतीचे आहे. समाजातील गरिबी, शिक्षणाचा अभाव आणि आरोग्यसेवेची अनुपलब्धता या सर्व गोष्टी अंधश्रद्धेला खतपाणी घालतात. असुरक्षिततेच्या काळात व्यक्तीला आपले प्रश्न "दैवी कारणां"तच उत्तर दिसते. ग्रामीण भारतात अजूनही आजारपणाला देवदंड मानले जाते, आणि झाडफुंक, बळी, तांत्रिक विधी अशा अवैज्ञानिक उपचारांचा अवलंब केला जातो. या परिस्थितीत तांत्रिक, ज्योतिषी आणि ढोंगी बाबांचा उदय होतो, जे लोकांच्या भीतीचा व्यापार करतात. त्यामुळे अंधश्रद्धा ही केवळ श्रद्धा नसून आर्थिक शोषणाचे साधन बनते. सामाजिक विषमतेत ती सत्ताधारी घटकांना आपला अधिकार टिकवून ठेवण्यासाठी एक वैध साधन पुरवते. अंधश्रद्धेचा स्त्रियांच्या जीवनावर विशेषतः भयावह परिणाम होतो. अनेक समाजांमध्ये महिलांना "डायन", "मंगळिक", "अपशकुनी" अशा लेबलांनी ओळखले जाते. अशा महिलांवर सामाजिक बहिष्कार, अत्याचार, मालमत्तेतील हक्क नाकारणे आणि आरोग्यसेवेपासून दूर ठेवणे ही सामान्य बाब आहे. पियर बोरद्यूच्या 'प्रतिकात्मक हिंसाचार' या संकल्पनेनुसार, अशा अंधश्रद्धात्मक आरोपांद्वारे समाज स्त्रियांचे स्वायत्त अस्तित्व नियंत्रित करतो. ही हिंसा नेहमी शारीरिक नसते; ती मानसिक, आर्थिक आणि सांस्कृतिक स्वरूपात होते. म्हणूनच अंधश्रद्धेविरुद्धच्या लढ्यात स्त्रीशिक्षण, आरोग्यसेवा, आर्थिक स्वावलंबन आणि समुदायस्तरीय संवाद ही महत्त्वाची साधने आहेत. अंधश्रद्धा निर्मूलनासाठी विज्ञान आणि तर्कशक्ती हाच सर्वात प्रभावी पर्याय आहे. विज्ञान माणसाला प्रश्न विचारायला शिकवते, निरीक्षणाद्वारे सत्य तपासायला प्रवृत्त करते. डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनी "तुम्ही मानायला मोकळे आहात, पण तपासायला विसरू नका" हा अत्यंत क्रांतिकारी संदेश दिला, जो विवेकवादाच्या चळवळीचा पाया ठरला. त्यांच्या या विचारसरणीने धार्मिक आंधळेपणा, तंत्र-मंत्र आणि ग्रहदोष यांसारख्या गैरवैज्ञानिक समजुतींना थेट सामाजिक आव्हान दिले. भारतीय राज्यघटनेच्या कलम ५१(अ)(h) मध्येही प्रत्येक नागरिकाने "वैज्ञानिक दृष्टिकोन, मानवतावाद आणि सुधारक वृत्ती" जोपासावी, असे स्पष्टपणे नमूद आहे. महाराष्ट्रातील "अंधश्रद्धा निर्मूलन आणि काळी जादू प्रतिबंध कायदा, २०१३" हा याच दिशेने उचललेला ऐतिहासिक पाऊल ठरला आहे. शिक्षण आणि माध्यमे ही अंधश्रद्धा निर्मूलनाची दोन अत्यावश्यक स्तंभ आहेत. शालेय शिक्षणात वैज्ञानिक दृष्टिकोन, तर्कशक्ती आणि विवेकवाद यांचा समावेश करणे आवश्यक आहे. माध्यमांनी देखील लोकजागृतीची जबाबदारी ओळखली पाहिजे. दुर्दैवाने, काही माध्यमे अंधश्रद्धेला बळ देतात, भविष्य सांगणारे कार्यक्रम, ज्योतिष सल्ले, आणि चमत्कारांचे प्रक्षेपण समाजाच्या विवेकाला भ्रमित करतात. उलट, विज्ञानाधारित माहितीपट, विवेकवादी चर्चा आणि सामाजिक प्रबोधनात्मक कार्यक्रम समाजातील बौद्धिक वातावरण समृद्ध करू शकतात. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, अंधश्रद्धा निर्मूलन ही केवळ व्यक्तीगत नव्हे तर सामूहिक प्रक्रियाही आहे. समाजातील बदल सामूहिक चेतनेवर अवलंबून असतो. म्हणून ग्रामपंचायतींपासून विद्यापीठापर्यंत "विवेक मंच", विज्ञान मेळावे, लोकशिक्षण आणि चर्चासत्रे आयोजित करणे आवश्यक आहे. अंधश्रद्धा निर्मूलनासाठी शासन, शिक्षणसंस्था, स्वयंसेवी संस्था, आणि सामान्य नागरिक यांचा सहभाग अत्यावश्यक आहे. अंधश्रद्धा ही समाजाच्या प्रगतीसमोरील सर्वात मोठा अडथळा आहे. ती व्यक्तीची विचारशक्ती कुंठित करते आणि समाजाला स्थैर्याऐवजी अस्थिरता आणते. समाजशास्त्रीय, वैज्ञानिक आणि सांस्कृतिक दृष्टिकोनातून पाहता, अंधश्रद्धा निर्मूलन ही केवळ मोहीम नाही, तर ती सामाजिक क्रांती आहे. शिक्षण, विज्ञान, तर्कशक्ती आणि विवेक या चार आधारस्तंभांवरच समाजाचा प्रकाशमान भविष्यकाळ उभा राहू शकतो. अंध:कारावर प्रकाशाचा विजय तेव्हाच खरा ठरेल, जेव्हा प्रत्येक मनात विवेकाचा दिवा पेटेल आणि हा दिवा ज्ञानाचा, विज्ञानाचा आणि मानवतावादाचा असेल.



डॉ. राजेंद्र बगाटे,
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
मो. क्र. ९९६०१०३५८२,
ईमेल –
bagate.rajendra5@gmail.com